# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शनिवार, दिनांक ०५ मार्च, २०२२ / फाल्गुन १४, १९४३ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **ग्रामविकास, कामगार मंत्री** | |
| **(५)** | **वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(७)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

---

### पारोळा (जि. जळगांव ) येथील ट्रामा केअर सेंटरच्या अद्ययावत इमारतीमध्ये ट्रामा केअर सेंटर कार्यरत करणेबाबत

**(१) * ३८६४९ श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) येथे ट्रामा केअर सेंटरची अद्ययावत इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनही सदर ट्रामा केअर सेंटर अद्याप कार्यरत झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटरसाठी आवश्यक यंत्र व साधन सामुग्री तसेच कर्मचारी अद्यापही उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आवश्यक त्या यंत्र सामुग्री सह, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नियुक्त करुन ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित करणे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदनाद्वारे दि.२२ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश सहसंचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई यांनी दि.२४ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त ट्रामा केअर सेंटर तातडीने कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. पारोळा (जि. जळगांव) येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर नाही. बांधकाम करण्यात आलेली इमारत ही आयपीएचएस अंतर्गत मंजूर अनुदानातुन रुग्णकल्याण समितीच्या मिटींगमध्ये ठराव मंजूर करुन केलेला आहे.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण २०१८/प्रक्र१९०/आरोग्य-३ दिनांक १८.०९.२०२० अन्वये ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यासंबंधीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. धोरणानुसार ट्रामा केअर सेंटर स्थापनेकरिता किमान १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असणे आवश्यक आहे. त्यामुळे जळगाव जिल्हयातील ग्रामीण रुगणालय पारोळा येथील प्रस्तावीत ट्रामा केअर युनिट हे धोरणातील अटींची पूर्तता करत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील रायगड जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(२) * ३७७१८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या देखभाल दुरूस्तीसाठी कोटयवधी रूपये खर्च करून सुद्धा सदर इमारत धोकादायक असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्थापत्य अभियंता यांनी जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत धोकादायक असल्याचा अहवाल स्थापत्य अभियंता यांनी दिला तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखभाल दुरुस्तीचे काम बंद ठेवण्याचे निर्देश देऊनही इमारतीमधील पाच विभागांचे नूतनीकरण करण्याचे काम बांधकाम विभागाने सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली कोटयवधी रुपये खर्च करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) रायगड जिल्हा परिषदेच्या मुळ प्रशासकीय इमारतीचे काम सन १९८३ या वर्षी पुर्ण झालेले असून इमारतीस सुमारे ३८ वर्षे झालेली आहेत. सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर वेळोवेळी आवश्यकतेनुसार इमारतीची दरवर्षी किरकोळ देखभाल दुरुस्ती करण्यात आली आहे. प्रस्तुत इमारत ही समुद्र किना-यालगत असल्याने व इमारतीमध्ये पावसाने होणारी गळती व भिंत तसेच छतांची वारांवार दुरुस्ती करावी लागत असल्याने प्रस्तुत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले. सदर

इमारतीचा स्ट्रक्चरल ऑडीट अंतरीम अहवाल आल्यानंतर प्रस्तुत इमारतीमध्ये कोणत्याही विभागाचे नुतणीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले नसून कोणताही अनावश्यक खर्च करण्यात आलेला नाही,
(३) हे खरे नाही,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खानवले (जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील (रसायनी) भूखंडासंदर्भात करोवा एलएलपी कंपनीने कागदपत्रामध्ये फेरफार केल्याबाबत

**(३) * ३७७४६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानवले (जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीत (रसायनी) सर्व्हे नं.४५, ४६ व ६४ या भूखंडाचा स्मशानभूमीसाठी वापर केला जात असताना करोवा एलएलपी कंपनीने ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांमध्ये फेरफार करुन स्मशान भूमिच्या भूखंडावर अवैधरित्या कब्जा केला असल्याचे प्रकरण माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कंपनी व्यवस्थापनावर व त्यांना प्रत्यक्ष मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

तथापि, विशेष नगर वसाहत प्रकल्पांतर्गत/लगत स्थित असलेल्या शासकिय जमिनी नगर वसाहत प्रकल्पाकरिता प्रदान करण्यासंदर्भातील नगर विकास विभागाच्या दिनांक २०.११.२०१८ च्या धोरणानुसार व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमातील

तरतूदीनुसार कब्जेहक्काच्या रकमेत कोणतीही सवलत न देता मौजे खानावळे ता. पनवेल जि. रायगड येथील सर्वे क्र. ४५, ४६ व ६४ एकत्रित क्षेत्र ४८.४० आर ही सार्वजनिक वापराखाली नसलेली शासकिय जमीन संबंधित नगर वसाहत प्रकल्पासाठी शासन ज्ञापन महसूल विभाग क्र. जमीन-२८२०/प्र.क्र.१६/ज-४अ, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२१ अन्वये कायदा/ नियमातील तरतूदीनुसार रितसर प्रदान केल्या आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लेवा ते बारभाई तांडा (ता.महागांव, जि. यवतमाळ) या गावांमध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४) * ३९५५४ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेवा ते बारभाई तांडा (ता.महागांव, जि. यवतमाळ ) या गावादरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत तयार करण्यात येत असलेल्या रस्त्यांच्या डांबरीकरणाचा थर हाताने काढत असल्याचा व्हिडीओ माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान व्हायरल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या निकृष्ट बांधकामाची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तेथील नागरिकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद् अनुषंगाने निकृष्ट बांधकाम करणाऱ्या संबधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सदर रस्त्याचे एम.पी.एम. चे काम पुर्ण झाल्यानंतर जानेवारी, २०२२ मध्ये कारपेटचे काम करण्यात आले असून

या महिन्यात अवकाळी पाऊस पडल्याने कारपेटचे काम वर्क अप होण्याआधी काही ठिकाणी नागरिक सदर कारपेट हाताने काढत असल्याचे व्हिडीओ व्हायरल झाला होता, हे खरे आहे. संबंधित कंत्राटदाराला आवश्यक त्या ठिकाणी वेळीच काम दुरूस्ती करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) संबंधित कंत्राटदाराला आवश्यक त्या ठिकाणी त्याचे स्वखर्चाने डांबरी पृष्ठभागाची दुरूस्ती करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. तसेच सदर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पुर्ण झाल्यानंतर राज्य गुणवत्ता निरीक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचेमार्फत पुन:श्च तपासणी करून मानकाप्रमाणे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडया, मिनी अंगणवाडया मध्ये वितरीत करण्यात येणाऱ्या पोषण आहार वितरणामध्ये होणारा गैरवापर रोखण्याबाबत

**(५) * ३९५४६ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गर्भवती, स्तनदा माता व बालकांना पोषण आहार घरपोच देण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडया, मिनी अंगणवाडया मधील लाभार्थी यांना आहार न मिळणे, निकृष्ट व कमी मिळणे किंवा वेळेत न मिळणे अशा तक्रारी वारंवार येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठेकेदारांकडून आहार वितरणामध्ये होणारा गैरवापर टाळण्यासाठी सप्लाय चेन मॅनेजमेंट सिस्टीम तयार करण्याकरिता शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने करावयाच्या उपाययोजनेबाबतचे निश्चित स्वरुप काय आहे ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना नियमीतपणे THR चे वाटप करण्यात येत आहे, तसेच कोव्हीड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहारा ऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्याचा निर्णय घेतलेला आहे. माहे डिसेबर-२०२१ च्या मासिक प्रगती अहवालानुसार खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना आहार पुरवठा झालेला आहे.

| ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके | ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालके | गरोदर स्त्रिया-स्तनदा माता | एकूण |
|---|---|---|---|
| ३०२९३७९ | ३६३७४७६ | ११९४४०१ | ७८६१२५६ |

आहार पुरवठ्या संदर्भात राज्यात एखाद्या ठिकाणी निकृष्ट आहार पुरवठ्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ कार्यवाही करुन आहार पुरवठा बदलुन घेण्यात येतो व संबंधीत पुरवठाधारकावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) सप्लाय चेन मॅनेजमेंट सिस्टीम तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. त्याद्वारे पुरवठा धारकामार्फत पुरवठा झाल्यानंतर अंगणवाडी स्तरावरुन माहिती मोबाईलद्वारे सप्लाय चेन मॅनेजमेंट सॉफ्टवेअर मध्ये अद्ययावत करता येईल व किती पुरवठा झाला याची माहिती उपलब्ध होईल. त्यामुळे पुरवठा धारकावर नियंत्रण ठेवणे तसेच लाभार्थ्यांना सुरळीत आहार पुरवठा करणे सोयीचे होईल.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अध्यापकांना अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) अध्यापकांच्या प्रमाणे भत्ते मंजूर करणेबाबत

**(६) * ३७७९१ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.संभाजी**

**पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) अध्यापकांच्या तुलनेत राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अध्यापकांना केवळ ९.५२ टक्के वैद्यकीय अभ्यास भत्ता व पदव्युतर भत्ता मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम्सच्या अध्यापकांना वर्षाला वैद्यकीय अभ्यास भत्ता २ लाख ७० हजार रुपये आणि पदव्युतर भत्ता १ लाख ५० हजार रुपये मिळतो तर राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांना वैद्यकीय अभ्यास भत्ता १० हजार आणि पदव्युतर भत्ता केवळ ३० हजार मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भत्त्यासह इतरही भत्ते वाढविण्याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या नागपूर येथील डॉक्टर नितीन करमरकर समितीने केलेल्या शिफारशींकडे दुर्लक्ष होत असून या समितीच्या शिफारशीनुसार वैद्यकीय शिक्षण विभागातील विविध भत्ते वाढवण्याच्या मागणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मेडिकलचे १६० शिक्षकांनी मार्गदर्शक पदाचा राजीनामा मेडिकलचे प्रभारी अधिष्ठाता यांच्याकडे दिला असल्याची बाब दि. ६ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून यामुळे मेडिकल मधील स्नातक व स्नातकोस्तर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना काळात स्वताचा जीव धोक्यात घालून रुग्णसेवा देणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तसेच रुग्णालयातील

अध्यापकांना वैद्यकीय अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) अध्यापकांच्या प्रमाणे वैद्यकीय अभ्यास भत्ता व पदव्युतर भत्ता मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## पुणतांबा (ता. राहाता, जि.अहमदनगर) येथील गोदावरी नदीवरील वसंत बंधाऱ्याच्या संरक्षक कठडया अभावी दुर्घटना होत असल्याबाबत

**(७) * ३८२३८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणतांबा (ता. राहाता, जि.अहमदनगर) येथील गोदावरी नदीवरील वसंत बंधाऱ्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असून पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे उक्त बंधाऱ्याच्या संरक्षक कठडया अभावी व रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अनेक गावातील ग्रामस्थ व शालेय विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी नदी काठावरील डोणगाव, लाखगांव, बापतर, पुरणगाव तसेच कान्हेगाव वारी, धोत्रे आदि आठ दहा गावातील ग्रामस्थ व शाळकरी विद्यार्थ्यांना दैनंदिन कामानिमित्त पुणतांब येथे याच बंधाऱ्यावरुन जीव धोक्यात घालून जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बंधाऱ्यावरील रस्त्याचे सुरक्षा कठडे आणि इतर देखभाल दुरुस्तीकरता तेथील स्थानिक ग्रामस्थांनी अनेकवेळा निवेदनाव्दारे मागणी करुनही संबंधित विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत

काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबधीत अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) सदर रस्ता हा सार्वजनिक वाहतूकीसाठी नसल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.
(३)सदर रस्ता हा सार्वजनिक वाहतूकीसाठी नसल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सेलू (जि.परभणी) तालुक्यातील निम्न दुधाना प्रकल्पातील कालव्यांना सिंचनाच्या सोयी देण्याबाबत

**(८) * ४०३४५ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील निम्न दुधना प्रकल्पातील पाण्याचा उपयोग दोन्ही कालव्या अंतर्गत केवळ १५ हजार हेक्टर वरील सिंचनासाठी होत असल्याने ५० हजार हेक्टर क्षेत्र सिंचन ओलीताखाली आणण्यासाठी अनेक वर्षापासून प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याने हजारो शेतकरी सिंचनापासून वंचित राहिल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मागील दहा वर्षात निम्न दुधना प्रकल्पास सिंचनाच्या सुविधा न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सेलू तालुक्यातील देवगाव फाटा, जवळा, नागठाणा, चिकलठाणा, खैरी निरवाडी, रायपुर, वालूर या भागासाठी एक कालवा आणि रवळगाव देऊळगाव गात, डासाळा, खवणे, पिंपरी, लाडनांदरा, गुगळी धामणगाव या भागासाठी दुसरा कालवा निम्न दुधना प्रकल्पातून काढल्यास, सेलू तालुक्यातील जमिनी ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांना त्याचा लाभ होऊ

शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सेलू तालुक्यातील निम्न दुधना प्रकल्पाच्या कालव्यांना सिंचन सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्याद्वारे एकूण २८६९८ हे. (ICA) सिंचन क्षमता आहे.

मुख्य कालवा, वितरीका, व भाग-१ ची कामे मागील पाच वर्षापासुन पुर्ण गतीने प्रगत असुन ती मार्च २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे. त्यानंतर धरणात उपलब्ध पाणी साठ्यानुसार सिंचन होणार आहे.

(२) ऑक्टोबर २०१६ मध्ये प्रकल्पास तृतीय सु.प्र.मा. प्राप्त झाल्यानंतर व नविन भुसंपादन कायद्यानुसार योग्य मावेजा मिळाल्या मुळे कामातील अडचणी दुर होऊन कालवा वितरीका व भाग-१ ची कामे गतीने सुरु झाली असुन मार्च २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

कालवा व त्यावरील कामे प्रगत असल्याने मागील १० वर्षात पुर्ण क्षमतेने सिंचनाच्या सुविधा लाभधारकांना मिळाल्या नाहीत.

(३) या गावांना सिंचन सुविधा पुरविणे प्रकल्पाच्या व्याप्ती बाहेरचे आहे. मंजूर प्रकल्प अहवालात सदर बाब समाविष्ट नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## हतरू (ता.धारणी, जि.अमरावती) येथील चुरणी येथे सुरु असलेल्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(९) * ३९९१९ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हतरू (ता.धारणी,जि.अमरावती) जिल्हा परिषद सर्कलमध्ये राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत चुरणी येथे सुरु असलेल्या रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असून यात लाखो रुपयांचा अपहार झाला असल्याची तक्रार हतरु जिल्हा परिषदेच्या सदस्य यांनी माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या इमारत बांधकामाच्या वेळेस संबंधित विभागाचे उपअभियंता/अभियंता हजर असणे आवश्यक असताना तेथे कोणतेही अभियंता हजर नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर इमारतीच्या बांधकामास उपअभियंता यांनी दिनांक ०७.०८.२०२१ ते २२.०१.२०२२ या कालावधीत एकूण ८ वेळा भेट दिलेली आहे. स्थानिक जिल्हा परिषद सदस्य यांनी केलेल्या तक्रारीवरुन माहिती घेण्यात आली असून दुसऱ्या स्लॅबचे वेळेस उपअभियंता हजर नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) उपअभियंता यांचे कामकाज असमाधानकारक असल्याने व कामातील हलगर्जीपणामुळे त्यांच्या सेवा दिनांक २०.१२.२०२१ पासून समाप्त करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## चिंबळी फाटा (ता. खेड, जि. पुणे) येथील सहारा दूध डेअरीत झालेल्या अपघाताबाबत

**(१) * ३८०२४ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंबळी फाटा (ता. खेड, जि. पुणे) येथील महाळुंगे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सहारा दूध डेअरीमधे बॉयलरचे उकळते पाणी चार कामगारांच्या अंगावर पडल्याने झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू तसेच तीन कामगार गंभीर जखमी झाले असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली,

(३)असल्यास, उक्त दुर्घटनेत मृत झालेल्या कामगाराच्या नातेवाईकांना तसेच जखमींना औषधोपचाराकरिता अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) मे.सहारा डेअरी प्रोडक्ट,गट नं.१६१,गोडाऊन नं.६ चिंबळी फाटा, कुरुळी ता.खेड जि.पुणे या कारखान्यात दि.३१.१२.२०२१ रोजी बॉयलरचे डिस्केलींगचे काम चालू असताना,बॉयलरमधील रसायन मिश्रीत गरम पाणी अंगावरती पडल्याने ४ कामगार भाजून जखमी झाले होते.

४ जखमी कामगारांपैकी २ कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून २ कामगारांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

(२) सदर कारखान्यातील अपघाताची माहिती मिळताच, उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे आणि उप संचालक, बाष्पके संचालनालय, पुणे यांनी चौकशी केली आहे.

कारखान्यातील बॉयलर डिस्केलींगचे (स्वच्छता) काम सुरू असताना कामाची सुरक्षित पध्दत आणि वैयक्तीक सुरक्षा साधनांचा वापर न

केल्यामुळे, बॉयलरमधील रसायन मिश्रीत गरम पाणी बॉयलरच्या झाकणातून ४ कामगारांच्या अंगावरती बाहेर फेकले गेले.

चौकशीदरम्यान आढळून आलेल्या नियमभंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ अन्वये मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी शिवाजीनगर, पुणे यांचे न्यायालयात दोन फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच बाष्पके अधिनियम, १९२३ आणि बाष्पके परिचर नियम,२०११ च्या नियमभंगाबाबत कारखाना व्यवस्थापनास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) सदर कारखान्यात झालेल्या अपघातातील सर्व कामगारांच्या औषधोपचाराचा खर्च रू.११,११,२८३/-कारखाना व्यवस्थापनाने केला असून मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई मिळण्याबाबत आयुक्त, नुकसान भरपाई, पुणे यांना कळविण्यात आले असून औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,पुणे या कार्यालयामार्फत पाठपुरावा सुरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## जलसंधारण विभागात अभियंता पदभरतीमध्ये अनियमित्ता झाल्याबाबत

**(११) * ३८३५३ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मृद व जलसंधारण विभागाच्या आयुक्तांना त्या विभागाचे प्रमुख म्हणून प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यांत आल्याचे व त्यानुसार गट-क व गट-ड या संवर्गातील नियुक्त्यांचे व पदस्थापना देण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आल्या त्यानुसार आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील नागरी सेवा मंडळाने दिनांक २४ जुलै ते १८ नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत करारपध्दतीने उपविभागीय अभियंता आणि शाखा अभियंता यांच्या नियुकत्या केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपायुक्त (प्रशासन) यांनी आयुक्तांनी तसेच निवडमंडळाने निवड केलेल्या उमेदवारांना डावलून त्यांची मान्यता न घेताच परस्पररित्या उपविभागीय अभियंता आणि शाखा अभियंता यांच्या भरतीत ५ अपात्र उमेदवारांना स्वत:च्या स्वाक्षरीने नियुक्ती आदेश दिले असून निवड झालेले उमेदवार रुजू होणार का नाही याची शहानिशा न करता अपूर्ण कागदपत्रे असणाऱ्या अपात्र व प्रतिक्षा यादीवरील ७ जणांना परस्पर नियुक्त्या देण्यात आल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियुक्त्या देतांना महसूल विभागानिहाय वाटप करुन पदस्थापना देणे गरजेचे असतांना तसे न करता थेट पदस्थापनेवर नियुक्त्या देण्यात आल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उपायुक्त (प्रशासन) यांनी परस्पर आयुक्तांचे अधिकार वापरुन आपल्या अधिकारात नेमलेल्या उमेदवारांसाठी शासनावर नाहक २ कोटी ३० लाख २४ हजार इतक्या रक्कमेचा भूर्दंड पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांचेकडून व्याजासह रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अंशत: खरे आहे.

सेवानिवृत्त उप- विभागीय अभियंता तसेच शाखा अभियंता यांची सेवा

करार पध्दतीने नेमणूक प्रक्रिया माहे. फेब्रुवारी २०२१ ते मार्च २०२१ मध्ये करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) मृद व जलसंधारण विभागामार्फत ६०० हेक्टर सिंचन क्षेत्रापर्यंतच्या लघुपाटबंधारे योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून या नवीन विभागातील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याने शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार, सेवा निवृत्त जलसंधारण अधिकारी (शाखा अभियंता) व सेवा निवृत्त उपविभागीय जलसंधारण अधिकारी (उपविभागीय अभियंता) यांचे सेवा केवळ विवक्षित कामासाठी करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याबाबत शासन मान्यतेने दि.२६/३/२०२१ च्या पत्रान्वये आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद कार्यालयामार्फत सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता/शाखा अभियंता या अधिकाऱ्यांना सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी करार पद्धतीने नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. सदर नियुक्त्या सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता/शाखा अभियंता यांचेमधून एक वर्षासाठी करार पद्धतीने करावयाच्या होत्या. सेवा करार पद्धतीने नियुक्त्या देताना महसुल विभागनिहाय पदस्थापना देण्याचे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मध्ये नमुद करण्यात आलेले नाही.

सदर भरती प्रक्रियेबाबत पुढारी या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद यांनी शासनास सादर केलेल्या अहवालात सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता/शाखा अभियंता या अधिकाऱ्यांना सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याच्या प्रक्रियेत प्रशासकीय अनियमितता झाल्याचे नमुद केले असून यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित तत्कालिन प्रशासकीय अधिकारी, तत्कालिन अधिक्षक व तत्कालिन कनिष्ठ लिपीक यांना आयुक्तांनी निलंबित केले असून तत्का.उपायुक्त (प्रशासन) यांना आयुक्तांनी दि. २७/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये आयुक्तालयातून एकतर्फी कार्यमुक्त केले आहे.

(५) व (६) सदर प्रकरणी आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## तेर (जि.उस्मानाबाद) येथील तेरणा मध्यम प्रकल्पाच्या माध्यमातून कॅनॉलची दुरुस्ती न झाल्याबाबत

**(१२) * ३९५८६ डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेर (जि.उस्मानाबाद) येथील तेरणा मध्यम प्रकल्पाच्या माध्यमातून उजवीकडे व डावीकडे कॅनॉलच्या माध्यमातून सुमारे १ हजार ६६५ हेक्टर जमिन सिंचनाखाली येण्यासाठी कॅनॉल दुरुस्तीसाठी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी संचालक यांच्याकडे अंदाजपत्रक पाठविण्यात येऊनही दुरुस्तीच्या प्रस्तावास मंजूरी मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद व लातूर जिल्हयातील अनेक गावास सिचंनासाठी उपयुक्त ठरत असलेला तेरणा मध्यम प्रकल्प धरण कालवा दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तेरणा धरणात सध्या ९५ टक्के पाण्याच्या सिंचनासाठी उपलब्ध असतांनाही केवळ योजनेतील कॅनॉलच्या दुरुस्ती अभावी गत चार वर्षापासून शेतकऱ्यांना या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू तेरणा धरणाच्या कालव्याच्या दुरुस्ती चे काम केल्यास मौजे तेर, रामवाडी, डकवाडी, इर्ला, दाउतपुर, कोळेवाडी, भंडारवाडी या गावातील जवळपास १६५५ हेक्टर शेत जमिन सिंचनाखाली येवू शकते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर कालव्याच्या दुरुस्तीस निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

विशेष दुरुस्ती अंदाजपत्रकास मंजूरीचे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार शासन स्तरावर आहेत.तेरणा मध्यम प्रकल्पाच्या कालव्याची दुरुस्तीचे अंदाजपत्रकाची महामंडळ स्तरीय छाननी समितीची बैठक दि.१४.०२.२०२२ रोजी झालेली असून विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक दि.१५.०२.२०२२ रोजी शासनास सादर केल्याचे महामंडळाने नमूद केले आहे. शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देणेबाबतची उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सन २०१७-१८ व सन २०२०-२१ मध्ये तेरणा मध्यम प्रकल्पामध्ये १००% पाणीसाठी उपलब्ध होता व या वर्षात अनुक्रमे ८८० हेक्टर व ५४१ हेक्टर क्षेत्र सिंचित झाले आहे. सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये तरेणा मध्यम प्रकल्पामध्ये अनुक्रमे ३३.७७% व १६.५१% असा कमी पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे पाणीसाठयाचा फक्त बिगर सिंचनासाठी वापर झाला आहे.

सदर प्रकल्पावर बंद पाईपलाईनद्वारे सिंचनाचा पथदर्शी प्रकल्प सन २०१२ मध्ये बांधकाम विभागामार्फत पूर्ण झालेला आह. यामुळे अस्तित्वातील कालव्याद्वारे सिंचन करणे बंद झालेले आहे. बंद पाईपलाईनच्या पथदर्शी प्रकल्पातून सतत गळती होत असल्यामुळे लाभधारकांनी कालव्याद्वारे सिंचनाची मागणी केली आहे. बंद पाईपलाईनच्या पथदर्शी प्रकल्पातील गळती बाबत दि.०५.०८.२०२१ चे आदेशान्वये समिती गठित करण्यता आली होती. समितीने तयार केलेला अहवाल दि.१५.०२.२०२२ रोजी महामंडळ कार्यालयास प्राप्त झाला आहे. समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

तेरणा मध्यम प्रकल्पाचे कालवा विशेष दुरुस्तीचे रु.३.४२ कोटी किंमतीचे अंदाजपत्रक दि.१५.०२.२०२२ रोजी शासनास सादर करण्यात आले असल्याचे महामंडळाने नमूद केले आहे. शासन स्तरावर सदर अंदाजपत्रकास

प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही करुन त्यास निधीची तरतूद झाल्यानंतर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.

(४) होय, हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

तेरणा मध्यम प्रकल्पाचे कालवा विशेष दुरुस्तीचे रु.३.४२ कोटी किंमतीचे अंदाजपत्रक दि.१५.०२.२०२२ रोजी शासनास सादर करण्यात आल्याचे महामंडळाने नमूद केले आहे. शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देणेची कार्यवाही करुन निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे करण्यात येतील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे रुखी (ता.वसमत,जि.हिंगोली) या गावात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्ताच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१३) * ३९१८६ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रुखी (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावातील नॅशनल रोड ते रुखी अंतर्गत सन २०१८-२०१९ या कालावधी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्यांच्या बांधकामात कंत्राटदाराने अधिकाऱ्यांशी संगनमत करुन निकृष्ट दर्जाचे गीट्टी व डांबर वापरल्याने रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे नागरीकांच्या वाहनांस वारंवार अपघात होऊन जिवीत हानी होऊन मालमत्तेच नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने कोटयावधी रुपये खर्च करुन निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) सदर रस्ता अंशत: क्षतीग्रस्त झाला आहे, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्यावरून वाहतूक सुरू असून जिवीतहानी झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाची वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचेमार्फत पुन:श्च तपासणी करण्यात आली असून यानुषंगाने प्राप्त चौकशी अहवालानुसार तक्रारीमध्ये अंशत: तथ्य दिसून येते. तसेच प्राप्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने रस्ता सुस्थितीत ठेवण्याबाबतची पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * ३९१३२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा प्रलंबित असल्यामुळे सन २०२१ वर्ष हे शुन्य प्रवेश वर्ष म्हणून नोंद झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संकटाच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात मनुष्यबळाचा अभाव असून देशातील दर हजारी लोकसंख्ये मागे अवघे १.३४ डॉक्टर्स उपलब्ध असतानाही वैद्यकीय प्रवेश परीक्षा सन २०२१ मध्ये न राबविल्याने

पदव्युतर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षणातील परीक्षा आणि प्रवेश यांचे संतुलन राखणे यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ,
(४) असल्यास, सन २०२२ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१)नाही, हे खरे नाही. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता केंद्रशासनामार्फत घेण्यात येणारी "नीट-पीजी" ही पात्रता परीक्षा दिनांक ११/०९/२०२१ रोजी घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल दिनांक २८/०९/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या कालावधीत ईडब्ल्यूएस आणि ओबीसी कोटयासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमुळे सन २०२१-२२ ची प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यास विलंब झाला होता. परंतू, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २०/०१/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानंतर राज्यस्तरीय कोटयाची प्रथम निवड यादी दिनांक २८/०१/२०२२ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(२) नाही, हे खरे नाही. सन २०२१-२२ करिता वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता "नीट-पीजी-२०२१" ही परीक्षा राबविण्यात आली असून त्याबाबतची प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) "नीट-पीजी" परीक्षा नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन, नवी दिल्ली यांचेमार्फत आयोजित करण्यात येते. सदर संस्थेने दिनांक ०४/०२/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या नोटीसीनुसार सन २०२२-२३ करिता "नीट-पीजी-२०२२" परीक्षा दिनांक २१ मे,२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालोरा ते पिपळा (ता.पारशिवनी, जि.नागपूर) या रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१५) * ३८३८० ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालोरा ते पिपळा (ता.पारशिवनी, जि.नागपूर) या रस्त्याचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत सन २०१९-२०२० मध्ये डांबरीकरण करण्यात आले असून सदर रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे एक वर्षात रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणारे ठेकेदार व त्यांना सहकार्य करणारे प्रशासनातील दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अशंत: खरे आहे.

सदर रस्ता क्षतीग्रस्त झाला आहे, हे खरे आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत सदर रस्त्याचे काम पुर्ण झालेले असून सदर रस्त्यावर विविध स्तरावर राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून तपासणी झाली असून तपासणीअंती समाधानकारक शेरे प्राप्त आहेत. तसेच सदर रस्ता इजिमा असून १३ ट्रक १० टन वजनापर्यंतचे सरासरी प्रती दिन वाहतुक वरील संकल्पनानुसार डिझाईन केला आहे.

सदर रस्त्यालगत वेस्टर्न कोल्ड फिल्ड लिमीटेड कंपनीच्या कोळशाच्या खाणी असून पिपळा गावा शेजारील नदीमधील रेतीचा उपसा होत आहे. सबब, कोळशाची जड वाहतूक व रेतीघाटावरून रेती भरलेल्या वाहनांची जड वाहतूक झाल्यामुळे, सदर रस्ता क्षतीग्रस्त झाला आहे. सदर रस्त्याची नादुरूस्त झालेली लांबी वाहतुकीच्या दृष्टीने सुस्थितीत करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## अहमदपूर (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित करण्याबाबत

**(१६) * ३८२७७ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात सहा वर्षापूर्वी ट्रामा केअर सेंटरची इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रामा केअर सेंटरमध्ये यंत्र व इतर सोयीसुविधा उपलब्ध नसल्यामुळे ही इमारत विनावापर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील ग्रामीण रुग्णालयात सिटीस्कॅन, सोनोग्राफी, डायलिसीस इत्यादी यंत्रसामुग्री नसल्यामुळे ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) ग्रामीण रुग्णालय अहमदपूर येथील ट्रामा केअर सेंटरची पहिल्या टप्प्यातील बांधकाम इमारत ताब्यात घेण्यात आली असून सदरील इमारत विनावापर नसून सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यात पूर्ण झालेल्या बांधकाम इमारतीचा वापर रुग्णसेवेकरीता करण्यात येत आहे.

विभागाने दि. २४.०७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नवनिर्मित आरोग्य संस्थांकरीता यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरीता प्रशासकिय मान्यात प्रदान करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ट्रामा केअर युनिट अहमदपूर, जि.लातूर या संस्थेचा समावेश आहे. सदरबाबतचा प्रस्ताव हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित खरेदी कक्ष यांचेकडे खरेदी करण्याकरीता सादर करण्यात आलेला आहे.

ट्रामा केअर सेंटरच्या सुविधांमध्ये सिटीस्कॅन, सोनोग्रॅफी, डायलिसिस या सुविधा येत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाशी संलग्नित अतिविशेषोपचार रुग्णालय येथे रक्त विघटन प्रकल्प सुरू करणेबाबत

**(१७) * ३९३१६ श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संलग्नित अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये पाच वर्षापुर्वी मंजूर असलेले रक्त विघटन प्रकल्प सुरु न करण्यात आल्याची बाब दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालयात रक्त विघटन सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना स्वखर्चने रक्त खाजगी रक्तपेढीतून आणावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प तातडीने सुरू करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अतिविशेषोपचार रुग्णालयामधील मंजूर असलेली रक्त विघटन प्रकल्प त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर या दोन्ही संस्था एकाच आवारात असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या रक्तपेढीमार्फत अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील रुग्णांना आवश्यकतेनुसार रक्तपुरवठा करण्यात येतो

(३) हे खरे आहे.

(४) व (५) अतिविशेषोपचार, नागपूर या संस्थेस रक्त विघटन प्रकल्पा करीता आवश्यक यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीसाठी अनुदान मंजूर झालेले असून यंत्रसामुग्री खरेदीची कार्यवाही हाफकीन महामंडळस्तरावर सुरु आहे

-----------------

## महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार मिळणेसंदर्भात

**(१८) * ३९३२६ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार आणि आवश्यक शस्रक्रिया करण्याची सुविधा असून यात कोणकोणत्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे,

(२) असल्यास, खासगी रुग्णालयांना महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत प्रसुती सुविधा होती तथापि नवीन वर्षात ही सुविधा बंद करण्यात आलीअसल्याने यापुढे मोफत प्रसुतीसाठी पात्र लाभधारकांना सरकारी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र या शासकीय रुग्णालयांतच जावे लागणार असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या योजनेअंतर्गत पोटातील विकार व त्यावरील शस्त्रक्रिया आर्थोपेडीकच्या शस्त्रक्रिया, मेंदूसंबंधित शस्त्रक्रिया, फुप्फुस आणि लिव्हरप्रत्यारोपण, कान, नाक, घसा या आजारांसह डायलिसीस सेंटरचाही समावेश करावा अशी मागणी सर्व स्तरांतून करण्यांत येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यात हेल्थ वेलनेस सेंटर सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेअंतर्गत खासगी रुग्णालयांमध्ये मोफत प्रसुती

सुविधा पुर्ववत सुरु करणे तसेच उक्त आजाराचा समावेश करणे व राज्यात हेल्थ वेलनेस सेंटर सुरु करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे** : (१) एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ३४ विशेषज्ञ सेवांतर्गत १२०९ प्रकारच्या उपचारांचा समावेश आहे. यामध्ये हृदय रोग, पोटाचे व आतड्यांचे विकार, हाडांचे आजार, तातडीचे उपचार, कर्करोग, मेंदूचे विकार, महिला व बालकांचे आजार, मूत्रपिंडाचे विकार, जळीत उपचार, प्लास्टिक सर्जरी, नेत्र रोग, कान नाक घसा यांचे आजार इ. आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे.

(२) कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर सर्व शासकीय रुग्णालये कोविड बाबत कामामध्ये व्यस्त असल्यामुळे शासकीय रुग्णालयांकडून नागरीकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांपासून वंचित राहू नये म्हणून शासनाने महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये CGHS च्या मान्यताप्राप्त दराने ६७ अतिरीक्त प्रोसिर्जससाठी काम करण्याची मुभा योजनेतील अंगीकृत खाजगी रुग्णालयांना दिनांक २३ मे २०२० ते ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत देण्यात आली होती व ६७ प्रोसिर्जसपैकी ८ प्रोसिर्जससाठी दिनांक १ आक्टोबर २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये अंगीकृत खाजगी रुग्णालयांना मोफत प्रसुती व सीझेरीयन सेवा यांचा समावेश करून काम करण्याची मुभा देण्यात आली होती.

सध्या राज्यामध्ये ओमिक्रॉनची रुग्ण संख्या काही प्रमाणात असली तरी बहुतांश रुग्णांची लक्षणे गंभीर स्वरुपात नसल्यामुळे घरी विलिगीकरणाद्वारे बरे होत आहेत, त्यामुळे शासकीय रुग्णालयांवर ओमिक्रॉन रुग्णांच्या उपचाराचा भार खुप कमी आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालये नॉन कोविड सेवा (ज्यात मोफत प्रसुती व सीझेरीयन सेवा यांचा समावेश) नागरीकांना सुरळीतपणे देत आहेत. ही बाब विचारात घेऊन महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने अंतर्गत ६७ उपचारांमध्ये समाविष्ठ असणाऱ्या मोफत प्रसुती व सीझेरीयन या सेवाना दिनांक १ जानेवारी २०२२

पासून मुदतवाढ न देण्यासंदर्भात प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) हे खरे नाही.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पोटातील विकार व त्यावरील शस्त्रक्रिया, ओर्थोपेडीकच्या शस्त्रक्रिया, मेंदुसंबंधित शस्त्रक्रिया, कान, नाक, घसा या आजारांसह डायलिसीस या आजारांवरील उपचारांचा समावेश आहे.

(४) हेल्थ अॅण्ड वेलनेस सेंटर योजना सन २०१६-१७ मध्ये सुरु झाली असून दिनांक २१.०२.२०२२ अखेर ६७६२ उपकेंद्रे, १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्र, ४६१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र अशी एकुण ९०५१ आरोग्य संस्था हेल्थ आणि वेलनेस सेंटर म्हणून कार्यरत आहेत.

(५) वरील (२), (३) व (४) प्रमाणे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे बोन बँक सुरु करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * ३८९२० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य भारतामध्ये अपघात व कर्करोगाचे वाढते रुग्णाचे प्रमाण लक्षात घेता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे बोन बँक सुरु करण्याकरिता सन २०२१ मध्ये जिल्हा नियोजन समिती मध्ये प्रस्ताव तयार करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, जिल्हा नियोजन समिती कडून रुग्णालयासाठी मिळणाऱ्या १२ कोटी रुपयांमधून बोन बँकेसाठी सुमारे १.५ कोटीची तरतूद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हाडांचा कर्करोग, अपघात, गुडघ्याचे सांधे बदली इत्यादी रुग्णांना शस्त्रक्रिया करण्यासाठी सदर बोन बँक निर्माण करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोन बँक सुरु करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

जिल्हा नियोजन समिती, नागपूर यांच्याकडून बोन बँक करीता रुपये १,३४,४०,४०० /- इतक्या रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे

(४) व (५) जिल्हा नियोजन समिती, नागपूर यांनी कोविड-१९ या आजाराचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असल्याने सदर निधी उपलब्ध होवू शकला नाही. तथापि, सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात निधी उपलब्धेकरीता प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२०) * ३८६०१ श्री.दौलत दरोडा ( शहापूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील शिळ-देहेर्जा गावालगत असलेल्या देहेर्जा नदीवर सन २०१९-२०२० मध्ये बांधलेल्या सिमेंट बंधाऱ्याला गळती लागल्यामुळे परिसरातील बागायती पिकांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने पहिल्याच पावसात एक भाग वाहून गेला असून बंधाऱ्याच्या उर्वरित भागाला मोठे भगदाड पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग यांनी गेल्या १५ वर्षात वाडा व विक्रमगड तालुक्यात लाखो रुपये खर्च करुन ५० हून अधिक बांधलेल्या सिमेंट बंधाऱ्यांपैकी ९० टक्के बंधाऱ्यांतून मोठ्या प्रमाणावर गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाडा व विक्रमगड तालुक्यातील बंधाऱ्यांची कामे निकष्ट दर्जाचे करणारे ठेकेदार व त्यांना सहाकार्य करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदरहू बंधाऱ्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) व (२) हे  खरे नाही.
दिनांक १६/०२/२०२२ रोजी सदर बंधाऱ्याची पाहणी केली असता (Foundation) पायाच्या एका ठिकाणाहून गळती आढळून आली आहे. सदर कामाचे दोष निवारण कालावधी मार्च २०२३ पर्यंत असल्याने संबंधित ठेकेदाराकडून मे, २०२२ मध्ये पाणी कमी झाल्यावर दुरुस्ती करुन बंधाऱ्याची गळती बंद करण्याची दक्षता घेण्यात आली आहे. सदर बंधाऱ्याचे काम अंदाजपत्रकानुसार योग्य दर्जाचे झालेले असून बंधाऱ्यात पूर्ण क्षमतेच्या  ८५ % पाणी साठा उपलब्ध आहे.
(३) हे खरे नाही,
(४) प्रश्न उद्‌भवत नाही. वाडा व विक्रमगड तालुक्यात आतापर्यंत बांधण्यात आलेल्या कुठल्याही बंधाऱ्यांची गळती होत असल्याबाबत/बंधारा फुटल्याबाबत अथवा बागायत पिकांचे नुकसान झाल्याबाबत कुठल्याही शेतकऱ्यांनी अथवा संबंधित ग्रा.पं. ने लेखी तक्रार केलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड-शिवतर (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील आंबये-सकपाळ वाडीच्या रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(२१) * ३८४३० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड-शिवतर (ता.खेड, जि.रत्नागिरी) या १४ कि.मी. रस्त्यादरम्यान आंबये

फाट्यापासून ते सकपाळ वाडी या अडीच किलोमीटर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी देऊनही सदरहू रस्त्याचे विकासकाम सुरु करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबये-सकपाळ वाडीतील हजारो ग्रामस्थ, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांची रस्त्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आंबये-सकपाळ वाडी च्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-१ अंतर्गत रत्नागिरी जिल्हयातील आंबये-मांजरकरवाडी-बाईतवाडी-सकपाळवाडी रस्ता, ता.खेड या १.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम मंजुर आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्याचे मातीकाम, मोरी बांधकाम, खडीकरण व एम.पी.एम. स्तरपर्यंत काम पुर्ण झाले असून उर्वरित काम लवकरात लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## महिला व बालविकास विभागांतर्गत काही पदे ही सरळसेवेने न भरता राज्यसेवा परीक्षेद्वारे भरली जाणार असल्याबाबत

**(२२) * ३९३५७ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागांतर्गत येणारे बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी), सहाय्यक आयुक्त, परिविक्षाधीन अधिक्षक, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी ही पदे आता सरळसेवेने न भरता राज्यसेवा परीक्षेद्वारे भरली जाणार असल्याने गेल्या तीन वर्षांपासून या परीक्षेची तयारी करणा-या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरळसेवा भरती प्रक्रिया आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगा (एमपीएससी) मार्फत केली जाणारी भरती प्रकिया ची पध्दत वेगळी असल्याने यासंदर्भात राज्यभरातील विद्यार्थ्यांकडून ही भरती प्रक्रिया सरळसेवेच्या माध्यमातून करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐनवेळी परिक्षेच्या सेवाशर्ती बदलून सदर परीक्षा प्रक्रिया दुस-या परीक्षेत वर्ग करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय दूर करण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१), (२), (३) व (४) गट-अ संवर्गासंदर्भात पुर्वीच्या सेवा प्रवेश नियमानुसार केवळ विहित अर्हता धारण करणारे उमेदवार सदर पदांसाठी अर्ज करण्यास पात्र होते. सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार सदर पदांसाठी कोणत्याही संवैधानिक विद्यापीठाची पदवी धारण करणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असणार आहेत. त्यामुळे सर्वच पदवीधर उमेदवारांना परिक्षेस बसण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने कोणत्याही उमेदवाराचे नुकसान होणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हा रुग्णालयास जागा हस्तांतर करण्यास होत असलेला विलंब

**(२३) * ३७९५२ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शासकिय वैदयकीय महाविदयालयास सार्वजनिक आरोग्य विभागाचे जिल्हा रुग्णालय हस्तांतरित झाल्यापासून गेली १४ वर्षे जिल्हा रुग्णलयासाठी जागा मिळाली नसल्याने जिल्हा शल्यचिकित्सक हे रुग्णालयविना असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी महाविदयालयाची दहा एकर जागा मिळाली असून सदर जागेचे हस्तांतरण अदयाप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागा हस्तांतरणाचा प्रश्न प्रलंबित असल्याने जिल्हया रुग्णालयासाठी मंजूर झालेला १३० कोटी रुपयांचा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जागा हस्तांतरणास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,त्यानुसार त शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) लातूर जिल्हयात सद्यास्थिती जिल्हा स्तरावर जिल्हा रुग्णालय नसले तरी संपूर्ण जिल्हातील २१ रुग्णालये जिल्हा शल्यचिकित्सक लातूर यांच्या नियंत्रणाखाली आहेत.

(२), (३) व (४) कृषी विभागाच्या दि. ४ फेब्रुवारी , २०१९ च्या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ , परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर सर्वे नं. ३७ मधील १० एकर जमीन जिल्हा रुग्णालय लातूर साठी हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि दि. ४ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर जमिनीचे प्रचलित बाजार मुल्य दराने येणारी रक्कम कृषी महाविद्यालय लातूर तसेच विद्यापीठाच्या विकास कामासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत नमुद करण्यात

आले आहे. तसेच सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने अधिकचा मुआजा संबंधितांस अदा करण्याबाबत आदेशित केल्यास सदर रक्कमेची भरपाई सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात यावी असे ही नमुद केले आहे. तथापि सदरील जमिन विनामुल्य वा नाममात्र दराने मिळण्याबाबत मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य विभाग) व मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य) यांचे स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या असून याबाबत महसुल व वन विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## दौंड (जि. पुणे) येथिल आरोग्य विभागाच्या प्रलंबित प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत

**(२४) * ४०४१० श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात वरवंड येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करणे व पाटस येथे ट्रॉमा केअर सेंटर व आरोग्य केंद्र सुरु करणे असे दोन प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधी सन २०१८ पासून वारंवार करीत असून मौ. वरवंड येथे विशेष बाब म्हणून ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्याचे आश्वासन तत्कालीन मंत्री यांनी माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे हे काय,

(२) असल्यास, मौजे वरवंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याच्या प्रस्तावास मान्यता घेण्याची सुरु असलेली कार्यवाही तसेच सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालयास्तरावरुन सुरु असून पाटस येथे ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, वरवंड येथील ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्याबाबत व पाटस येथे ट्रॉमा केअर सेंटर व आरोग्य केंद्र सुरु कधीपर्यंत कार्यान्वित होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे वरवंड ता.दौंड जि.पुणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव निर्णय प्रक्रियेमध्ये आहे. दिनांक १८ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये ट्रामा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सचूनांनूसार लेवल -३ ट्रामा केअर युनिट सुरु करण्यासंदर्भात शासन शिफारस करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या तांत्रिक समितीच्या शिफारशी स्वीकारण्यास व त्याबाबत कार्यपूर्तता अहवालास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार नवीन लेवल-३ टीसीयू सुरु करण्यास मान्यता देताना ते जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय (१०० बेड) या ठिकाणी मंजूर करण्याबाबत तसेच त्यासाठी दोन लेवल-३ टीसीयू मध्ये १०० ते २०० कि.मी. अंतराची अट आहे. या अटींची पूर्तता होत नसल्याने पाटस येथील ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याचा प्रस्ताव निकषात बसत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इंदापूर (जि.पुणे) येथील उपजिल्हा रुग्णालयातील शवविच्छेदन करण्यात आलेल्या मृतदेहांच्या अवशेषांची अवहेलना झाल्याबाबत

**(२५) * ३८४२५ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या अवारात असणा-या शवविच्छेदन गृहाशेजारी शवविच्छेदन करण्यात आलेल्या मृत व्यक्तींचे अवशेष उघड्यावर तसेच जळलेल्या अवस्थतेत टाकण्यात येत असून ते अवशेष डुक्कर, भटकी कुत्रे आदी प्राणी खात असल्याचा प्रकार माहे,डिसेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यसंदर्भातील तक्रार मयत श्री.जनार्दन गोळे यांचे नातलग श्री.गणेश पवार यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेमुळे तेथील अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा दिसून येत असल्याने या प्रकरणी चौकशी करून दोषीं असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयातील शवविच्छेदन केलेल्या व्यक्तींच्या अवशेषांची विल्हेवाट चुकीच्या पद्धतीने लावल्याने मृतदेहांची अवहेलना होत असल्याने यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार या प्रकरणात दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणे सह असे प्रकार यापुढे घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) खरे आहे.

(४) व (५) जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांनी वैद्यकीय अधिकारी (शरीरक्रियाशास्त्रज्ञ), जिल्हा रुग्णालय, पुणे यांची याप्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. चौकशी अधिकारी यांनी दिनांक २८.१२.२०२१ रोजी उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर येथील संबधितांची चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार प्रभारी वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चा भंग केलेला असून त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केलेली आहे. प्रभारी वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निम्न तेरणा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत

**(२६) * ३९११० श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा उपसा सिंचन योजना (पंपगृह क्र. १ते ५) दिनांक १ एप्रिल, २००४ रोजी सिंचन व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात आली असून सदर योजनेची सिंचन क्षमता ६८९० हेक्टर असून उस्मानाबाद ५७०० हेक्टर, लोहारा ८३० हेक्टर, व औसा ३६० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन योजनाद्वारे सिंचनासाठी ४७.३१ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित असून उस्मानाबाद शहरास पिण्यासाठी व औद्योगिक वसाहतीसाठी २.८३ द.ल.घ.मी. पाणी साठा आरक्षित केलेला आहे तथापि शेतकरी वर्गासाठी महत्वाकांक्षी असलेल्या योजनेचा पंप हाऊस बंद असल्याने योजनेचा लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या पंप हाऊसला लागणाऱ्या सामुग्रीचे अंदाजपत्रक सन २०१८ मध्ये तयार करुन पुढील कार्यवाहीस पाठविण्यात येवूनही सदर योजना कार्यान्वित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

सन २०१३ पासून निम्न तेरणा प्रकल्पात पाणी उपलब्ध नसल्यामुळे सदर योजना बंद अवस्थेत होती. दरम्यानच्या कालावधीत चोरीच्या घटना घडल्यामुळे सदर उपसा सिंचन योजना बंद आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदरील योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणारे यांत्रिकी व विद्युत विभागाचे सविस्तर अंदाजपत्रक प्राप्त करून घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालात औषधांच्या व वैद्यकीय सामग्रींचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(२७) * ३७६९० श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक औषधांचा ७० टक्के तुटवडा भासत असून थकीत देयकांअभावी औषधांचा पुरवठाही खंडित करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील सर जे.जे.रुग्णालय हे आरोग्य व्यवस्थेमधील महत्त्वाचे रुग्णालय असुन येथे मुंबईसह राज्यातून वैद्यकीय उपचारांसाठी येणाऱ्या

रुग्णांची संख्या ही जास्त आहे तथापि सदर रुग्णालयात औषधांचा तसेच वैद्यकीय सामग्रीचा तुटवडा भासत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असताना वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक औषधे तसेच वेदनाशमक इंजेक्शन एन्टानिल सायट्रेट, एमोक्सिन क्लेव्ह इंजेक्शन, सर्पदंशासाठी देण्यात येणाऱ्या अँटी स्नेक वेनम, हेपॅटायटीस बी इम्युनोग्लोबिन, पॅरासिटॅमॉल, स्टराइल वॉटर इत्यादी औषधे सध्या रुग्णालयात उपलब्ध नसल्याचे दि. ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयात सन २०२०-२१ मध्ये नोंदणी केलेल्या औषधांपैकी केवळ ३० टक्के औषधाचा साठा उपलब्ध असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हाफकिन व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (डीएमईआर) यांच्याकडे औषध पुरवठा केलेल्या किमान ९० कोटी व ज्यांनी थेट डीएमईआर अंतर्गत औषध पुरवठा केलेल्या किमान ४० कोटी अशी एकूण १३० कोटी रुपयांची देय बाकी रक्कम दिली गेली नसल्यामुळे औषधांचा पुरवठा बंद केला असल्याचे ऑल फूड अन्ड ड्रग लायसन्स होल्डर्स फाउडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.अभय पांडे यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणास जबाबदार असण्या-या संबधित दोषी अधिका-यावर कारवाई करण्यासह रुग्णांवर उपचारासाठी लागणारे आवश्यक औषधे तसेच वैद्यकीय सामग्री पुरवठा सुरळीत करण्यासह औषध पूरवठादारास थकित देयके अदा करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

(४) नाही.

(५) ऑल इंडिया फूड अन्ड ड्रग लायसन्स होल्डर्स फाउडेशनने भुक हरताळ

करणार असल्याबाबत दि.०४.११.२०२० रोजी निवेदन हाफकिन महामंडळास दिले आहे.

(६) हाफकिन महामंडळाकडील व वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थास्तरावरील थकित देयके अर्थसंकल्पीय अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## किनवट (जि.हिंगोली) तालुक्यातील कनकवाडी येथील साठवण तलावाचा प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत

**(२८) * ४०२१६ श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.हिंगोली) तालुक्यातील कनकवाडी येथील साठवण तलावाच्या भुसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्याने गेल्या १५ वर्षापासून साठवण तलावाचे काम अर्थवट असल्याने या भागातील अनेक गावे आजही उन्हाळयात टंचाईग्रस्त यादीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त साठवण तलावासाठी भुमिअधिग्रहणाचा प्रस्ताव जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद प्रस्तावित आहे पण नविन नियमाप्रमाणे भुमि अधिग्रहणाच्या प्रस्तावासाठी नविन रेकॉर्ड करुन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले, तद्अनुषंगाने साठवण तलावासाठी भुसंपादनाचा मोबदला मिळण्यासाठी व अर्धवट असलेली कामे पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

नविन भुसंपादन कायद्याप्रमाणे सदरची जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे

थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याकरिता तसेच कामाच्या किंमतीत मोठी वाढ झाली असल्यामुळे दिनांक १५/०२/२०२२ च्या निर्णया अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ,औरंगाबाद यांनी सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान केलेली आहे.

(३) कनकवाडी साठवण तलाव या योजनेला, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांचे निर्णयान्वये रु.३३८.८१ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यामधुन भुसंपादन व कामावर एकुण रू. ३४०.६१ लक्ष खर्च झालेला आहे. भूसंपादनाचा शिल्लक मोबदला अदा करण्यासाठी रू. ४००.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. सद्या रु. १५०.००लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असुन मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

प्रकल्पावरील वाढीव खर्चाला महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून दि. १५/०२/२०२२ च्या आदेशान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. निधी उपलब्धतेनुसार शिल्लक मोबदला रकमेचे वाटप करून प्रकल्पाचे उर्वरीत काम देखील पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) येथील ६५ गावांची पाणीयोजना मार्गी लावण्याबाबत

**(२९) * ३९८६१ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (ता.म्हैसाळ, जि.सांगली) येथील टप्पा क्र.तीन मधून चार वितरिकेच्या माध्यमातून वंचित ६५ गावांना पाणी देण्यात येणार असल्याचे प्रस्ताविक आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मूळ म्हैसाळ योजनेतून येथील काही तलाव भरत नसल्यास त्यांचाही समावेश या योजनेत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तलाव व वितरिकेच्या माध्यमातून येथील किमान ५० ते ६० हजार एकर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन, या प्रस्ताविक योजनेवर निर्णय, मान्यता व निधीची तरतूद करुन या योजनेचे काम तातडीने सुरु

करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) या योजनेचे प्राथमिक सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाले असून संकल्पनाचे व प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## वरोरा (जि.चंद्रपूर) येथे पंतप्रधान आवास योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३०) * ३८६९२ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या यादीमध्ये अनेक त्रुटी असल्याने अनेक लाभार्थी सदरहू योजनेपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मोठया प्रमाणात फेरफार करण्यात आला असल्याने त्यांची चौकशी करण्याची लाभार्थ्यांकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

सदर सर्वेक्षण झालेल्या लाभार्थी कुटुंबांपैकी, पात्र व अपात्र कुटूंबांची नावे आवास सॉफ्ट प्रणालीवर उपलब्ध झालेली आहेत. सदर वेबसाईटवर उपलब्ध अहवालानुसार चंद्रपूर जिल्हयातील वरोरा तालुक्यातील एकुण ९५३६ एवढया कुटुंबांचे सर्वेक्षण आवास ॲपवर पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर कुटुंबांपैकी घरकुल योजनेकरीता पात्र ठरवावयाच्या केंद्र शासनाने ठरविलेल्या निकषानुसार, एकुण ९५३६ एवढया कुटूंबांपैकी एकुण ६४५६ एवढी कुटूंबे पात्र ठरली असून, एकुण ३०८० एवढी कुटूंबे अपात्र ठरली आहेत. सदर अपात्र कुटूंबांची नावे Rejected by System या नावाने अपात्रतेच्या कारणासह उपलब्ध झालेली आहेत.

सदर सर्वेक्षणाचे काम ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक व आपले सरकार सेवा केंद्रातील डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे मार्फत सन २०१८-१९ मध्ये करण्यात आलेले आहे. व त्यावेळी लाभार्थ्यांकडून जी माहिती विचारण्यात आली ती माहिती आवास ॲपवर भरण्यात आलेली आहे. व त्या आधारे आवास प्लस डेटा बेस मध्ये पात्र व अपात्र (Rejected by System) याद्या ग्रामपंचायत निहाय उपलब्ध झालेल्या आहेत.

राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत "प्रपत्र ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या परंतु पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.१८/०५/२०२१ च्या पत्रान्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तथापि, सदरचा लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील माहीम-केळवा येथे बांधलेल्या झांझरोळी धरणाच्या दुरावस्थेबाबत

**(३१) * ३९००६ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील माहीम-केळवा येथील सन १९८१ मध्ये बांधलेल्या झांझरोळी धरणाला तडे गेले असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त धरणातून दातिवरे, खर्डी, डोंगरे, कोरे, मथाणे, उसरणी, आगरवाडी, नागावे, माकुणसार, सावरे यासह १८ गावांना पाणीपुरवठा होत असून धरणास तडे गेल्यामुळे पाच पाडे पाण्याखाली जाऊन दीड हजार गावकऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धरणाची शासनाने पहाणी केली आहे काय, पहाणीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने धरणाच्या तात्काळ दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी माहीम केळवा ल.पा. योजना ता.जि.पालघर येथे मुख्य विमोचकाच्या रेषेतील धरणाच्या प्रवाहाला खालच्या बाजूस ४.०० मी. रुंद भराव ढासळून पोकळी निर्माण झाली.

(२) होय, अंशतः खरे आहे,

धरणाच्या उर्ध्व भागात पोकळी निर्माण झाल्याचे निदर्शनास येताच तात्काळ जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व तहसिलदार यांना सुचित करण्यात आले.

धरणाखालील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला व NDRF ची तुकडी तैनात करण्यात आली. त्यावेळी धरणावर कोणतीही पुर परिस्थिती निर्माण झाली नसून कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

(३) दि.१२/११/२०२१ रोजी अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांनी धरणाची पाहणी केली आहे.

माहिम केळवा ल. पा. योजनेच्या धरणाच्या साखळी क्र. ५७ मी. वर मुख्य विमोचकामधुन प्रवाहच्या खालच्या बाजुच्या मुख्य भिंतीच्या उजव्या बाजूस मोठ्या प्रमाणावर गळती होत होती. धरणाच्या उर्ध्व बाजुस ताडपत्री (Tarpaulin) लावुन त्यावर Sand Bag ठेवण्यात आल्या. त्यामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले.

तसेच धरणाच्या ऊर्ध्व बाजूस मुख्य विमोचकाच्या व विहिरी भोवती माती भराव व खालच्या बाजूस खडी, वाळू व मातीच्या सहाय्याने धरणाच्या वरील भागातील पोकळी भरण्यात आली.

धरणाच्या दुरुस्तीबाबत.

धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने माहीम केळवा लघु पाटबंधारे योजनेची दुरुस्ती व पुनर्स्थापना संदर्भातील मातीकाम (Earth work) शिर्ष कामे (Head Work) व इतर कामाचे अंदाजपत्रक प्रादेशिक कार्यालयात मंजुर झाले आहे व सदर काम माहे मे, २०२२ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इगतपुरी (जि.नाशिक) येथील ट्रामा केअर कार्यान्वित करण्याबाबत

**(३२) * ३८९१४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालया शेजारील ट्रामा केअर इमारतीचे अदयाप उदघाटन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महामार्गावरील व कसारा घाटातील अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळावेत याकरिता सदरहू ट्रामा केअर इमारत बांधण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी दुर्गम भागातील गेल्या तीन वर्षापासून दोन कोटी

रुपये खर्च करुन बांधण्यात आलेली ट्रामा केअर इमारत अदयाप कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, त्यानुसार सदर ट्रामा केअर सेटर कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर ट्रॉमा केअर युनिट इमारतीचे किरकोळ कामे व इलेक्ट्रीक सप्लाय जोडणी याबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु असल्यामुळे सदरची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप हस्तांतरीत झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर इमारतीचे किरकोळ कामे व इलेक्ट्रीक सप्लाय जोडणीचे कामे सुरु आहेत. शासन निर्णय दि. ०६/०६/२०१९ अन्वये ट्रॉमा केअर युनिट, इगतपुरी येथे पदनिर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच यंत्रसामुग्री खरेदीबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ अंतर्गत खरेदीबाबत निविदा प्रसिध्द करण्यांत आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फुरूस (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मुलाला एकाचवेळी कोविड प्रतिबंधक लसीचे दोन डोस दिल्याबाबत

**(३३) * ३७९८७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुरूस (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये

एका १५ वर्ष वयाच्या मुलाला एकाचवेळी कोविड प्रतिबंधक लसीचे दोन डोस देण्यात आल्याची घटना  दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास घडल्याची निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गंभीर घटनेनंतरही जिल्हा आरोग्य विभागाने केवळ चौकशीचा दिखावा केल्याचा आरोप सदर मुलाचे पालक आणि स्थानिक ग्रामस्थांनी केला असून याबाबत मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्याकडे लेखी तक्रारही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने यास जबाबदार असण्याऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर घटनेबाबत मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्याकडे पालकांनी लेखी तक्रार केली होती. दि.११.१.२०२२ रोजी जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी चौकशी केली आहे.

सदर चौकशीमध्ये मुलाला लस देत असताना सुई टोचली असता त्याने घाबरुन हात झटकला व जागेवर उठून उभा राहिला. त्यामुळे सुई टोचली परंतु लसीची मात्रा देण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित आरोग्य सेविकेने विद्यार्थ्याला परत खाली बसण्यास सांगीतले व लसीची मात्रा दिली. विद्यार्थ्याला सुई जरी दोनदा टोचली असली तरी लसीची मात्रा एकदाच देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयात अंगणवाडयात बेबी केअर कीट उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * ३९४४७ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात बालमृत्यू रोखण्यासाठी आवश्यक बेबी केअर कीट अंगणवाडयांतून उपलब्ध होत नसून या योजनेसाठी तरतूदच केली गेली नसल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणी केलेले लाभार्थी या किटच्या प्रतिक्षेत असून ते किटसाठी अंगणवाडीत सतत जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार या योजनेसाठी निधीची तरतूद करुन येथील लाभार्थींना बेबी केअर किट उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

बेबी केअर किट ही योजना नागपूरसह राज्यातील सर्व जिल्हयातील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणा-या नवजात बालकांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी मुलगा किंवा मुलगी जन्मल्यानंतर त्यांना मोफत लागू करण्यात आलेली आहे. त्याकरिता आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना बेबी केअर किट उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पालघर जिल्हयातील रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३५) * ३९७०६ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर ग्रामिण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करुन तेथे मनुष्यबळाची उपलब्धता, आर्थिक अनुदान तसेच सी.एस.आर. दात्यांच्या विनंतीनुसार रुग्णालयाच्या नावात कमलाबेन रामनाथ धुत शासकीय उपजिल्हा रुग्णालय, पालघर असे करावे अश्या मागणीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मौ.परळी (ता.वाडा, जि.पालघर) या आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्याचा निर्णय मागील दोन वर्षापूर्वी घेतल्याचे तसेच वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्यास माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी देण्यात आली असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यावेळच्या लोकसंख्यांचे निकषानुसार म्हणजे सन १९६० मध्ये वाडा येथे बांधण्यात आलेल्या ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन रुग्णालय अपुरे पडत असून तेथे दररोज तेथे ३०० ते ३५० बाहयरुग्णांची तपासणी करण्यात येत असून प्रत्येक महिन्याला ८० ते ९० प्रसुती होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयांसाठी पाच ते साडेपाच एकर जागा लागते तथापि सध्या अडीच एकर जागा उपलब्ध असल्यामुळे नवीन जागेत रुग्णालय बांधावे की जुने बांधकाम तोडून नविन रूग्णालय बांधायचे याचा निर्णय झालेला नसल्यामुळे बांधकामास उशिर होत असल्याचे वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, वाडा यांचेकडून सांगण्यात येत आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यामुळे आदिवासी गोरगरीब जनतेची गैरसोय होत असून त्यांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पालघर ग्रामिण रुग्णालयाचे, मौ.परळी येथील रुग्णालयाचे तसेच ग्रामीण रुग्णालय, वाडा याचे श्रेणीवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, वाडा येथे सद्दस्थितीत दररोज १७० ते १८० बाह्यरुग्ण उपचार घेतात तसेच मासिक ७० ते ७५ प्रसूती होत आहेत.
(४) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, वाडा येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचेस्तरावर सुरु आहे. तसेच नवीन ५ एकर शासकीय जागा मिळणेबाबत उपविभागीय अधिकारी, वाडा यांना पत्र देण्यात आलेले आहे.
(५) हे खरे नाही.
रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) * ३८२२५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यासाठी तिर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयात शवविच्छेदन विभाग असल्यामुळे शवविच्छेदनासाठी येणाऱ्या मयत रूग्णांच्या कुटुंबियांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील वावंजे, नेरे, आजिवली, आपटा, गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध असूनसुद्धा शवविच्छेदन केले जात नसल्यामुळे ग्रामीण भागातील रूग्णांच्या नातेवाईकांना उपजिल्हा रूग्णालयात जावे लागत असल्यामुळे त्यांना शारिरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ग्रामीण भागातील रूग्णांच्या नातेवाईकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी उक्त प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथील मृतदेह शवविच्छेदन विभाग दिवसरात्र चालू असतो. मृतदेह रुग्णालयात आल्यानंतर तातडीने शवविच्छेदन करुन अहवाल संबंधितांना देण्यात येतो. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांना सदर रुग्णालयाकडून कोणत्याही प्रकारच्या अडचणीस सामोरे जावे लागत नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन केंद्रे जागेअभावी बांधलेली नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आपत्कालीन प्रकरणांमध्ये पोलीस अधिकाऱ्या सोबत जावून प्रत्यक्ष जागेवर शवविच्छेदन करतात तर इतर प्रकरणी शवविच्छेदन डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालय, पनवेल व ग्रामीण रुग्णालय, चौक येथे केले जाते.

(३) ०२ प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा जिल्हा परिषदेच्या नावावर नसल्यामुळे तसेच ०३ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात जागा उपलब्ध

नसल्यामुळे शवविच्छेदनगृह बांधण्यात आलेले नाही. तथापि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गावात जागा उपलब्ध करुन घेवून शवविच्छेदनगृह बांधण्याबाबतच्या सूचना जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, रायगड यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील व्यावसायीक संस्थांनी सेवा किंवा वस्तूंचा पुरवठा न करता बनावट पावत्या तयार केल्याबाबत

**(३७) * ३७७७१ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पुणे आणि नागपूर या शहरांमध्ये १४ हून अधिक व्यावसायीक संस्थांनी कोणत्याही सेवा किंवा वस्तूंचा पुरवठा न करता ३८५ कोटी रुपयांहून अधिक रक्कमेच्या बनावट इनपुट टॅक्स क्रेडीट अर्थात कर परताव्याचा दावा करत कर चोरी करणाऱ्या व्यावसायीकांना मुंबई विभागाच्या नवी मुंबई सीजीएसटी आयुक्तालयाने अटक केल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात केंद्रीय वस्तू आणि सेवाकर (सीजीएसटी) आणि पालघर आयुक्तालयाने एका तरुण लेखपालाला १ हजार कोटी पेक्षा जास्त रकमेची बनावट देयके तयार केल्याबद्दल तसेच १८१ कोटी रुपयांची जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडीटद्वारे फसवणूक केल्याप्रकरणी माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास अटक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी येथील व्यवसायिकाने तीस कोटी रुपयांचे कागदोपत्री व्यवहार दाखवून साडेपाच कोटी रुपयांची वस्तू व सेवा कराचा (जीएसटी) अपहार केल्याप्रकरणी माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान अटक

केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्याअनुषंगाने राज्यातील कर चोरी करणाऱ्या व्यावसायिकांविरुध्द कारवाई करुन किती गुन्हे दाखल करण्यात आले व किती रक्कम वसूल करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) नमुद प्रकरणामध्ये केंद्रीय वस्तु व सेवाकर विभाग यांनी कार्यवाही केलेली असल्याचे नमूद आहे. यास्तव याबाबतची माहिती राज्यकर विभागाकडे उपलब्ध नाही.

(२) सदरहू कारवाई केंद्रीय वस्तु व सेवाकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेली असल्याने याबाबतचा तपशील राज्यकर विभागाकडे उपलब्ध नाही.

(३) सदरहू कारवाई केंद्रीय वस्तु व सेवाकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेली असल्याने याबाबतचा तपशील राज्यकर विभागाकडे उपलब्ध नाही.

(४) उक्त कारवाई केंद्रीय वस्तु व सेवाकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेली असल्याने सदर व्यापाऱ्यावरील त्यापुढील कार्यवाही सुद्धा त्यांचेकडूनच अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुळा पाटबंधारे विभागातील राहुरी, नेवासा, शेवगांव, पाथर्डी (जि.अहमदनगर) येथील थकीत पाणीपट्‌टी वसुलीच्या नोटीसा शेतकऱ्यांना दिल्याबाबत

**(३८) * ३९६६४ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळा पाटबंधारे विभागातील राहुरी, नेवासा, शेवगांव, पाथर्डी (जि.अहमदनगर) येथील सुमारे ४६ वर्षापासूनची उजव्या कालव्या खालील

लाभार्थी शेतकऱ्यांकडे पाटपाणी वापराचे तसेच पाणीपट्टी थकबाकी सक्तीने वसुलीच्या नोटीसा शेतकऱ्यांना जलसंपदा विभागाने  दिल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी जुनी थकबाकी शेतकऱ्यांनी न भरल्यास शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावर रकमेचा बोजा चढविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी थकबाकी सक्तीने वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

नाशिक प्रदेश कार्यालयांतर्गत येणा-या मुळा मोठा प्रकल्पाचे लाभक्षेत्रामध्ये महाराष्ट्र सिंचन पदधतीचे शेतकऱ्यांकडून सिंचन व्यवस्थापन कायदा सन २००५ नुसार पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर पाणी वापर संस्था स्थापन होण्यापुर्वीची सिंचनाची ७.७२ कोटी इतकी थकबाकी असून सिंचन वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या अनुषंगाने पाणीपट्टी थकबाकीच्या वसुलीच्या नोटीसा थकबाकीदारांना बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) नाही.

सदरहु थकबाकीदार शेतकऱ्यांना पाणीपट्टी थकबाकी वसुलीबाबत सद्यस्थितीत  पहिली व दुसरी नोटीस बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्‍यकीय महाविद्‍यालय आणि रुग्णालयामध्ये अस्थायी म्हणून कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांची सेवा नियमित करण्याबाबत

**(३९) * ३७८३७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सचिन कल्याणशेट्‌टी (अक्कलकोट), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वैद्‍यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात अत्यावश्यक उपचार सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या मुंबईसह राज्यभरातील सर्व १८ शासकीय वैद्‍यकीय महाविद्‍यालय आणि रुग्णालयातील अस्थायी सहाय्यक प्राध्यपक डॉक्टरांना त्यांची सेवा नियमित करण्याचे केवळ आश्वासन दिले असून त्यावर काहीच कार्यवाही होत नसल्याने त्यांनी दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास बेमुदत सामुहीक रजा आंदोलनाला सुरुवात केली असून त्यानंतर जे.जे. रुग्णालयात साखळी उपोषण करण्याचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा

त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले असून दिनांक १७ जानेवारी, २०२२ वा त्यासुमारास राजीनामे देणे सुरु केले असून आतापर्यंत १३० हून अधिक वैद्यकीय पदव्युत्तकर शिक्षकांनी राजीनामे दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निकषानुसार वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांची ८० टक्के हजेरी, त्यांची विशिष्ट संख्येने चर्चासत्र व कार्यशाळा, विविध शोध प्रबंधांचे सादरीकरण, रुग्णसेवेच्या इतरही सर्व उपक्रमात सहभाग आवश्यक असतो तथापि प्राध्यापकांच्या आंदोलनामुळे या विद्यार्थ्यांचे उपक्रम बंद असल्याने त्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अस्थायी सहाय्यक प्राध्यपक डॉक्टरांना गत वर्षी आंदोलन केल्यानंतर वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी येत्या आठ दिवसात प्राध्यापक डॉक्टरांच्या सेवा नियमित करण्याबाबत व सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन आणि इतर भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळावेत या प्रलंबित मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कंत्राटी नियुक्त्या करण्याबाबतचा निर्णय दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील अस्थायी सहाय्यक प्राध्यापक डॉक्टरांना सेवेत नियमित करणे तसेच त्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) संघटनेच्या मागण्यांसंदर्भात संबंधित सर्व विभागांचे अभिप्राय घेवून सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्तरावर योग्य तो निर्णय घेतला जाईल अशी मा.मंत्री (वै.शि.) यांची भूमिका आहे.

(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबतची कार्यपध्दती पुर्वापार अस्तित्वात असून दि.२७/०१/२०२२ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत केवळ या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याचा व सध्याच्या मानधनाच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(५) व (६) शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालयात कर्करोगग्रस्त रुग्णांना उपचार मिळत नसल्याबाबत

**(४०) * ३९६०१ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहर व जिल्हयात दरमहा १०० ते १५० इतके कर्करोग रुग्णांचे प्रमाण असून येथील छत्रपती सर्वोपचार रुग्णालयात (ता.जि.सोलापूर) सोई-सुविधांचा अभाव असून कर्करोग रुग्णांना किमोथेरेपी व रेडिएशनची सोय उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजारावर रुग्णालयात मोफत उपचार व स्वतंत्र विभागाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

(२)हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (मुंबई) येथील चिरागनगर परिसरातील केमिकल कंपनीत वायू गळतीमुळे मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४१) * ३७९७८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील चिरागनगर परिसरातील एन.एस.एस. रोडवरील एका केमिकल कंपनीची इथेनॉल टाकी साफ करण्यासाठी टाकीत उतरलेल्या तीन कामगारांपैकी एका कामगाराचा इथेनॉल व सिन्युरिक क्लोराईट या विषारी वायु गळतीमुळे गुदमरुन मृत्यू झाला असून दोन कामगारांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यांना राजावाडी रुग्णालयात दाखल केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) मे.एस.के.डायस्टफ्स ॲण्ड ऑरगॅनिक केमिकल्स प्रा.लि. ६, कुर्ला इंडस्ट्रीयल इस्टेट, एन.एस.एस. रोड, नारायण नगर, घाटकोपर(प.), मुंबई या कारखान्यात दि.१०.०१.२०२२ रोजी रिॲक्टरमध्ये स्वच्छतेचे काम चालू असतांना रिॲक्टरमधील रसायनांच्या शिल्लक वाफांमुळे एका कामगाराचा गुदमरुन मृत्यू झाला. सदर कामगारास वाचविण्यास गेलेल्या दोन कामगारांना श्वसनाचा त्रास झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय उपचारानंतर दोन्ही कामगारांना घरी सोडण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणाची चौकशी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचेकडून केलेली आहे.

चौकशी दरम्यान कारखान्यातील रिॲक्टरमध्ये प्रवेश करण्याआधी रिॲक्टरमध्ये आरोग्यास धोकादायक असलेली रसायने शिल्लक नसल्याबाबतची खातरजमा तज्ञ व्यक्तींकडून लेखी स्वरुपात प्राप्त करुन घेण्यात आलेली नव्हती असे निदर्शनास आले. तसेच, रिॲक्टरमध्ये प्रवेश करण्याकरिता सेल्फ ब्रिदिंग ॲप्रेटस न वापरल्याचे व रिॲक्टरमध्ये प्रवेश करणा-या कामगारास दोरी बांधून त्याचे एक टोक रिॲक्टरच्या बाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीस दिले गेले नसल्याचे आढळून आले.

सदर दुर्घटनेत मृत झालेल्या कामगाराच्या वारसास नुकसान भरपाई म्हणून कारखाना व्यवस्थापनाकडून रु.११,८३,०२४/- इतक्या रकमेचा धनादेश आयुक्त, नुकसान भरपाई, मुंबई यांच्या न्यायालयात जमा करण्यात आलेला आहे. तसेच मृत कामगाराच्या पत्नीस रु.१२,५०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आलेली आहे.

तसेच, दुर्घटनेतील जखमी झालेल्या दोन कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाने केला असून वैद्यकीय उपचारानंतर दोन्ही कामगार दि.११.०१.२०२२ रोजी कारखान्यातील कामावर रुजू झाले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रामध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४२) * ३८५१३ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात १८०५ अंगणवाडी केंद्र असून त्यातील ३१५ अंगणवाड्यांमध्ये शौचालये नाहीत, तर १२१७ अंगणवाड्यांमध्ये पाण्याची

टंचाई व इतर सुविधांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्याच्या पाण्यासाठी येथील अंगणवाडी मध्ये काम करण्याऱ्या मदतनीस यांना बाहेरून पाणी आणावे लागते तर बालकांना घरूनच पाणी सोबत घेऊन यावे लागत असल्यामुळे याचा त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व अंगणवाड्यांमध्ये शौचालये व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) गोंदिया जिल्हयात ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात महिला व बाल विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेली नियमित अंगणवाडी केंद्र १५६८ व मिनी अंगणवाडी केंद्र २३७ असे एकूण १८०५ अंगणवाडी केंद्रांपैकी जलजीवन मिशन अंतर्गत १३८९ अंगणवाडयांना ग्रामपंचायत द्वारे नळ जोडणी झालेली आहे. उर्वरीत ४१६ अंगणवाडी केंद्रांना जलजीवन मिशन अंतर्गत नळ जोडणीची कार्यवाही संबंधित ग्रामपंचायत द्वारे करण्यात येत आहे.

तसेच १५३५ अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा आहे. उर्वरित २७० अंगणवाडी केंद्रांना १५ वा वित्त आयोग व ग्रामपंचायत नियोजनातून टप्या-टप्याने अंगणवाडी शौचालय बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.बालकांना पिण्यासाठी पाणी घरुन आणण्यासाठी अंगणवाडी स्तरावरुन सूचना दिल्या जात नाहीत. तसेच सदर अंगणवाडी केंद्रात पिण्याच्या पाण्याची सोय नळाव्दारे उपलब्ध होईपर्यंत मदतनीसद्वारे पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येत आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता गोंदिया जिल्हयातील २०२ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा करिता रु. २०,२०,०००/- व २६ अंगणवाडी केंद्रांना रु. ३,१२,०००/- इतकी तरतूद शौचालय बांधकामाकरिता उपलब्ध करुन दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील मेळघाट येथील सेमाडोह व हरिसाल येथील टेलीमेडिसीन सेवा पुन:श्च कार्यान्वित करण्याबाबत

**(४३) * ३७६९२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाट येथील सेमाडोह व हरिसाल येथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून निर्माण केलेली तसेच मा.मुख्यमंत्री यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेली टेलीमेडिसिन सेवा ही निधी अभावी काही महिन्यांतच बंद पडली असल्याचे माहे जानेवारी,२०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेलीमेडिसीनच्या माध्यमातून गंभीर आजार किंवा तातडीच्या व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णांवर कोणते व कसे औषधोपचार करावेत यासंदर्भात थेट मुंबई, पुणे व नागपूर येथील तज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधून रुग्णांवर उपचार करणे सोयीस्कर होत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टेलिमेडिसीन सेवा बंद पडल्याने मेळघाट येथील डॉक्टरांना शहरातील तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन गंभीर आजारांवर उपचार करण्यास अडचण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले असून येथील आदिवासींना गंभीर आजारावर उपचारासाठी तालुका व जिल्हा मुख्यालय येथे जावे लागत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच,मेळघाट येथे मोबाईल टॉवर नसल्याने इंटरनेट सेवा बंद पडत असल्याने ऑनलाईन शाळ, मोबाईल सेवा व इंटरनेट अभावी इतर सर्व मुलभूत सुविधा बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर सेवेची अमंलबजावणी करण्याकडे दूर्लक्ष करण्याऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदर सेवा पुनश्च कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील सेमाडोह व हरिसाल येथे CSR अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या टेलिमेडीसीन सेवेमध्ये ४०० रुग्णांनी लाभ घेतला होता. दरम्यान ई-संजीवनी कार्यक्रमांतर्गत उपजिल्हा रुग्णालय, धारणी आणि ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा येथे टेलिमेडीसीन सेवा सुरु करण्यात आली आहे. तसेच मेळघाट मधील ११ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ७ ठिकाणी ई-संजीवनी सेवा उपलब्ध असून उर्वरित प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये इंटरनेट सुविधा प्राप्त होताच टेलिमेडीसीन सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(२) हे खरे आहे.

गंभीर आजारी रुग्णावर उपचार आणि गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया या सेवा उपलब्ध असणाऱ्या धारणी आणि चिखलदरा येथील रुग्णालयांमध्ये ई-संजीवनी टेलीमेडीसीन सेवेद्वारे मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ तज्ञांशी संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

मेळघाट भागात मोबाईल व इंटरनेट सुविधेकरीता ५० Micro BTS Tower अंतर्गत ५० गावात इंटरनेट सुविधा पुरविण्याबाबत नियोजन करण्यात आले होते. त्यापैकी ३७ गावात Micro BTS Tower बसविण्यात आले आहेत. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात कामगारांच्या नोंदणीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४४) * ३८६९४ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात हजारो बनावट

कामगारांची नोंदणी करुन ५ हजार रोख रक्कमेचा लाभ देताना मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील खार आंबोली धरणाच्या उजव्या तीर कालवा व डाव्या तीर कालव्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(४५) * ३९७१६ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील खार आंबोली धरणाचे काम सन २००९ या कालावधीत पूर्ण होऊन धरणाच्या कामासाठी शासनाने रुपये २९ कोटी इतका निधी खर्च केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत प्रस्तावित असलेल्या सदर धरणाची पाणी साठवणूक क्षमता ९४०० स.घनमीटर असून त्यामुळे ६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असतांना धरणाच्या उजव्या तीर कालवा व डाव्या तीर कालव्यांची कामे सन २०१५ या कालावधी पासून बंद असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरण परिसरातील १५ गावातील शेतकऱ्यांनी कालव्यांची अपूर्ण राहिलेली कामे सुरु करण्याबाबत तक्रारी व निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कालव्यांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) अंशतः खरे आहे.
(४) अंबोली लघु पाटबंधारे प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता आवश्यक असून प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावाबाबत नियोजन विभाग तसेच वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. सदर द्वितीय सुप्रमा अहवालात अंबोली धरणाच्या उजव्या व डाव्या तीर कालव्याच्या उर्वरित कामांचा समावेश असून प्रकल्पास द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कालव्याचे उर्वरित काम निधी उपलब्धतेनुसार दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यात जीवन अमृत रक्त पेढी (ब्लड ऑन कॉल) ही सुविधा बंद होत असल्याबाबत

**(४६) * ३९७१० श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जीवन अमृत रक्त पेढी (ब्लड ऑन कॉल) ही २०१३ पासून सुरु असलेली सुविधा मार्च अखेर बंद करण्याचा निर्णय घेतला आल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्ताची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांची यामुळे गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही योजना बंद केल्याने रुग्णांची होणारी गौरसोय टाळण्यासाठी सदर सुविधा कायम ठेवणे किंवा पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

जीवन अमृत रक्त पेढी (ब्लड ऑन कॉल) योजनेस मिळत असलेला अल्प प्रतिसाद व आर्थिकदृष्टया व्यवहार्य नसल्यामुळे दिनांक १८ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये सदरची योजना दिनांक ३१.०३.२०२२ पासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यामध्ये ३५० रक्तकेंद्रे व ३४७ रक्त साठवणूक केंद्रे एवढे मोठे रक्त संक्रमण सेवेचे जाळे व याव्दारे पुरेसा रक्तसाठा उपलब्ध असल्यामुळे रक्त मिळण्याबाबत रुग्णांची गैरसोय होणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील धरण परिसरातील धान उत्पादक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याबाबत

**(४७) * ३८५३२ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यात रब्बी हंगामाच्या धान पिकासाठी इटियाडोह धरणाचे पाणी देण्याची मागणी धरण परिसरातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी केली असून शेतकऱ्यांनी धरणाच्या गेटसमोर दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजीपासून साखळी उपोषणास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी रब्बी हंगामाला अर्जुनी मोरगाव तालुका सोडून गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरीपर्यंत पाणी देण्याचे पाणीवाटप संस्थांनी ठरविल्यामुळे धरण परिसरातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अर्जुनी मोरगाव तालुक्यातील धरण परिसरातील धान उत्पादक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) अधीक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ भंडारा, व प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता, यांनी उपोषण ठिकाणी भेट देवून उपोषणकर्त्यांना उपोषण मागे घेण्याबाबत त्यांना परावृत्त करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

तथापि धरण परिसरातील उपोषण कर्ते शेतकऱ्यांच्या मागणीची तिव्रता लक्षात घेता नियोजित क्षेत्रातील थकीत पाणीवापर संस्थांचे क्षेत्र वगळून इतर क्षेत्राला पाणीपुरवठा करणे शक्य असल्याने ४०० हेक्टर सिंचन क्षेत्राला पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन दिलेने उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले. दि.१६.०१.२०२२ पासून मुख्य कालव्यातून सिंचनाकरिता पाणी सोडण्यात आलेले असून सद्य:स्थितीत सिंचन सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयातील गिरणा धरणांच्या पाटचाऱ्याची दुरुस्तीस निधी उपलब्ध करणेबाबत

**(४८) * ३९७२४ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील गिरणा धरणाची साठवण क्षमता १८ टीएमसी असून त्याद्वारे चाळीसगाव, भडगांव, पाचोरा, एरंडोल व धरणगांव या

तालुक्यातील २१ हजार हेक्टर क्षेत्रातील रब्बी हंगामाच्या शेतीला लाभ मिळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चाळीसगांव, भडगांव आदि भागातील पाटचाऱ्यांचे लोखंडी पाटया, व्हॉल्व्ह खराब झाल्यामुळे तसेच तेथे झाडेझुडपी वाढल्याने त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने पाणी वाया जात असल्याने शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी धरणाच्या पाटचाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत तेथील शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे वारंवार तक्रारी करुनही पाटचाऱ्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद केली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती पाटचाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) खरे नाही.

आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(४) पाटचाऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी सन २०२१-२२ मध्ये रु.४५९.४३ लक्षची प्रापण सूची मंजूर करण्यात आली आहे. त्याप्रमाणे निधी उपलब्ध करुन दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत. तसेच पाखरण कार्यक्रमांतर्गत रु.१५० लक्षची कामे प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.